INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF
HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी व सर्वसाधारण भूमी उपयोजनाचा भौगोलिक अभ्यास

**सुनिता राजाराम चाफेकानडे**
पदव्युत्तर भूगोल विभाग,
मिलिंद कला महाविद्यालय, औरंगाबाद

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/06.2021-11684675/IRJHIS2106042

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था ही त्याठिकाणच्या कृषी व औद्योगिक विकासावर अवलंबून असते. भारतासारख्या कृषीप्रधान देशामध्ये आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू म्हणून कृषीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. देशातीलच नव्हे तर जगातील सामूहिक विकास व प्रगती ही त्याठिकाणच्या भूमी उपयोजनावर अवलंबून असते. प्रत्येक ठिकाणचे भूमी उपयोजन हे स्थल आणि काळानुसार बदलणारे असते. भारतातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास ७० टक्के लोकांचा प्राथमिक व्यवसाय शेती आहे. म्हणून कृषीचे महत्त्व लक्षात घेता कृषी लागवडीखालील एकूण क्षेत्र किती आहे व इतर सर्वसाधारण भूमी वापर किती आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

मानव विकासाच्या प्राथमिक अवस्थेत असताना शिकार व मासेमारीद्वारे स्वत:चा उदरनिर्वाह करत असे. अशातच त्याला पशुंचे महत्त्व कळाल्याने व वनस्पतींद्वारे फळांचे महत्त्व भूक भागविण्यासाठी लक्षात आल्यानंतर तो विशिष्ट बियांची जाणीवपूर्वक लागवड करुन पशुपालन करु लागला आणि अशाप्रकारे शेती व्यवसायास सुरुवात झाली.

**संशोधन पद्धती :**

हा शोधनिबंध तयार करण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्याची सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेली माहिती, भूमी उपयोजनातील बदल समजावून घेण्यासाठी, भाटियाची पीक केंद्रीकरण पद्धती तसेच डॉ. जसबीरसिंग यांची विकेंद्रीकरण निर्देशांक पद्धती, यांचा उपयोग भूमी उपयोजनाचा तक्ता व आकृतीबंध तयार करण्यासाठी वापर केला आहे. तसेच विविध संदर्भग्रंथ, शासकीय अहवाल व इतर प्रकाशित साहित्याचा वापर केला आहे, तसेच इंटरनेटद्वारे माहिती गोळा केली आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

१. औरंगाबाद जिल्ह्याची प्राकृतिक रचना अभ्यासणे.

२. औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी भूमी उपयोजन अभ्यासणे.

३. औरंगाबाद जिल्ह्यातील सर्वसाधारण भूमी व भूमी कृषीउपयोजन यांचा सहसंबंध आणि त्याचा एकंदरीत शहरीकरणावरील प्रभाव अभ्यासणे.

४. कृषी भूमी उपयोजना संदर्भातील विविध योजना व जलसिंचन सुविधा यांचा अभ्यास करणे.

५. औरंगाबाद जिल्ह्यातील औद्योगिकरण व ऐतिहासिक वारसा यामुळे झालेला आर्थिक विकास व भूमी उपयोजनावरील परिणाम अभ्यासणे.

**कृषी भूगोल - अर्थ व व्याख्या :**

कृषी भूगोलाचे महत्त्व लक्षात घेता कृषीचा अर्थ सर्वप्रथम स्पष्ट होणे महत्त्वाचे आहे. कृषीमधील मानवी क्रियांची दोन वैशिष्ट्ये सांगता येतात. एक म्हणजे पिकांची लागवड करणे आणि दुसरे म्हणजे प्राण्यांची जोपासना करणे. याचाच अर्थ, ''कृषी म्हणजे पिकांची लागवड करुन प्राण्यांची जोपासना करणे होय.''

**१) हिलमॅन -**

यांच्या मते, ''देशानुसार व खंडानुसार शेतीचा तुलनात्मक अभ्यास ज्या भूगोलाच्या शाखेत केलेला आहे त्या भूगोलाच्या शाखेस 'कृषी भूगोल' असे म्हटले जाते.''

**२) एल. जे. सायमन -**

यांच्या मते, ''कृषी भूगोल म्हणजे कृषी व्यवहारांचा स्थल संदर्भात केलेला अभ्यास होय.''

**३) जसबीर सिंह -**

यांच्या मते, ''कृषी भूगोल म्हणजे भौगोलिक दृष्टिकोनातून केला जाणारा कृषी अभ्यास होय.''

**भूमी उपयोजन : अर्थ व व्याख्या -**

मानव त्याच्या गरजेनुसार भूमीचा उपयोग करत असतो. भूमी उपयोग हा भौगोलिक अध्ययनाचा पैलू आहे. प्रादेशिक नियोजन व विकासात भूमी उपयोग नकाशांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. स्टॅम्प यांनी मानवी गरजांचे वर्गीकरण अन्न, वस्त्र, निवारा, दळणवळण, संरक्षण व मनोरंजन या सहा प्रकारात केले आहे. या सर्व गरजांची पूर्तता करण्यासाठी मानवास भूमीचा उपयोग लक्षात घ्यावा लागतो. अन्नाची गरज पूर्ण करण्यासाठी अन्न उत्पादन अर्थातच कृषी व्यवसाय करावा लागतो. पडीक जमिनीचा उपयोगही आवश्यकतेनुसार कृषीसाठी करावा लागतो. नापीक अथवा खडकाळ जमिनीचा उपयोग मानवाकडून शक्यतो वाहतूक व दळणवळणासाठी केला जातो. भूमी उपयोजन हे स्थळ व काळानुसार बदलत असते.

**भूमी उपयोजनाच्या व्याख्या :**

एखाद्या भूभागाचा उपयोग प्राकृतिकपणे किंवा मानवी कारकांनी होत असेल तर त्यांना 'भूमी उपयोग' (Land Use) असे म्हणावे लागेल. भूमी उपयोगासंबंधीच्या पुढील काही तज्ञांच्या व्याख्या लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**१) आर. बी. मंडल -**

यांच्या मते, ''भूमीच्या प्रत्येक तुकड्यांच्या पर्याप्त मात्रेपर्यंत वापर करणे म्हणजे भूमी उपयोग होय.''

**२) डॉ. डी. एस. चव्हाण -**

यांच्या मते, ''प्राकृतिक पर्यावरणामध्ये भूमी प्रयोग एक तात्पुरती प्रक्रिया आहे तर भूमी उपयोग मानवी इच्छेनुसार बनविण्यात आलेली दीर्घकालीन प्रक्रिया आहे.''

**३) टी. डब्ल्यू. फोरमॅन -**

यांच्या मते, ''विशिष्ट क्षेत्रात विशिष्ट वेळेला विशिष्ट ठिकाणी विकसित व अविकसित भूमीचा केला गेलेला वापर म्हणजे भूमी उपयोग होय.''

अशाप्रकारे वरील विविध व्याख्यांवरुन असे म्हणता येईल की, भूमीचा विविध घटकांसाठी मानवाने केलेला वापर म्हणजे भूमी उपयोग होय. पूर्वी ज्या कार्यासाठी एखाद्या विशिष्ट भूमीचा वापर केला जात असे; कालांतराने त्याच भूमीचा उपयोग अन्य कार्यासाठी केला जाऊ शकतो. अशा पद्धतीने उपलब्ध भूमीच्या प्रत्येक तुकड्याचा जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न केला जातो.

विविध देशामध्ये भूमी उपयोजनाचे प्रमाण वेगवेगळे असते. जमिनीची उपलब्धता, देशातील लोकसंख्या, तिची गुणवत्ता व आवश्यकता यानुसार भूमी उपयोजनाच्या प्रकारात फरक पडतो. प्रदेशातील भूमी उपयोजनानुसार विकासाची पातळी लक्षात येते. प्रामुख्याने भूमी उपयोजनाचे पुढील दोन प्रकारात विभाजन करता येईल.

**अ) ग्रामीण भूमी उपयोजन -**

यामध्ये ग्रामीण भागातील हवामान, मृदा, उताराचे स्वरुप, जलसिंचनाच्या सुविधा, नैसर्गिक साधनसंपत्ती, सरकारी धोरण इ. घटकांचा प्रभाव ग्रामीण भूमी उपयोजनावर पडत असतो. हे भूमी उपयोजन पुढीलप्रकारे स्पष्ट करता येते.

१) निवासी किंवा बिगर शेती क्षेत्र

२) निव्वळ लागवडीखालील क्षेत्र

३) पडीक, ओसाड व अनुत्पादक भूमी

४) वनजमीन म्हणजेच निव्वळ लागवडीखाली नसलेले क्षेत्र

५) गायरान किंवा माळरान

**ब) नागरी भूमी उपयोजन -**

नागरी भूमी उपयोजनावर भू-क्षेत्राचे स्थान, नैसर्गिक साधनसंपत्ती, गृहनिर्माण, वाहतूक मार्ग, औद्योगिक विकास, व्यापार, मनोरंजनाच्या सुविधा, सरकारी धोरण इ. चा परिणाम होतो. नागरी भूमी उपयोजन पुढील प्रकारे करता येते -

१) निवासी क्षेत्र

२) व्यावसायिक क्षेत्र

३) वाहतूक सुविधांचे क्षेत्र

४) सार्वजनिक सेवांचे क्षेत्र


५) मनोरंजन सेवांचे क्षेत्र

६) मिश्र भूमी उपयोजन

एकंदरीतपणे भूमी उपयोजनाचा अर्थ पुढील आकृतीबंधाद्वारे लक्षात येईल.

**महाराष्ट्र भूमी उपयोजन २०१०-२०११**

| अ. क्र. | भूमी क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | लागवडीखालील क्षेत्र | ५६.८% |
| २ | वनाखालील क्षेत्र | १६.९% |
| ३ | बिगरशेती क्षेत्र | १०.२% |
| ४ | चराऊ व लागवडी योग्य पडीत क्षेत्र | ७.९% |
| ५ | पडीक क्षेत्र | ८.३% |



**भूमी उपयोजनाचे विश्लेषण :**

औरंगाबाद हा जिल्हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील महत्त्वाचा जिल्हा असून मराठवाड्याच्या राजधानीचे शहर आहे. मराठवाड्याचे प्रवेशद्वार असलेल्या औरंगाबाद जिल्ह्यात एकूण ९ तालुके असून त्यामध्ये औरंगाबाद, खुलताबाद, सोयगांव, सिल्लोड, गंगापूर, कन्नड, फुलंब्री, पैठण आणि वैजापूर यांचा समावेश होतो.

**१) स्थान व विस्तार :**

औरंगाबाद जिल्ह्याचा उत्तर-पश्चिम भाग पूर्णा-गोदावरी नदी खोऱ्यात येतो. जिल्ह्याचे उत्तर रेखांश १९° आणि २° व पूर्व देशांतर ७४° ते ६६° आहे. जिल्ह्याच्या उत्तर भागामध्ये सातमाळा आणि अजिंठा डोंगररांगा पूर्व-पश्चिम पसरलेल्या असून दक्षिण भागात सातारा डोंगर तर पूर्व भागात चौक्याचे डोंगर पसरलेले आहेत. मध्यवर्ती भागात वेरुळच्या टेकड्या असून दक्षिण भागात गोदावरीचे मैदान आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील व तालुक्यांमध्ये १३४४ गावे असून एकूण जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे १०,१३०.८९ चौ.कि.मी. इतके आहे.

**२) नदीप्रणाली :**

औरंगाबाद जिल्ह्याच्या दक्षिणेस गोदावरी ही प्रमुख नदी असून खाम, शिवणा, येळगंगा या तिच्या उपनद्या तर उत्तरेला पूर्णा, अंजना, गिरीजा, वाघूर इ. नद्या वाहतात. त्याचप्रमाणे भारतातील मोठा जलसिंचन बहुद्देशीय प्रकल्प गोदावरी या नदीवरील पैठण या ठिकाणी 'जायकवाडी - नाथसागर प्रकल्प' या नावाने ओळखला जातो. याच्या सभोवताली पक्षी अभयारण्य व उद्यान असून संत एकनाथ महाराजांचे जन्मस्थान व समाधीदेखील पैठण येथे आहे.

**३) ऐतिहासिक वारसा :**

औरंगाबाद हे शहर ऐतिहासिक दृष्टीकोनातून महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. या शहराला ५२ दरवाजांचे शहर म्हणून ओळखले जाते. त्याचप्रमाणे औरंगाबाद गुफा, पितळखोर लेण्या, किले अंतुर, सिता-नहाणी, सोनेरी महल, ऐतिहासिक ग्रंथालये, गौताळा अभयारण्य, सलीम अली सरोवर, बीवी का मकबरा, सिद्धार्थ उद्यान इ. अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत.



**४) पर्यटन स्थळे :**

पर्यटनाच्या बाबतीत औरंगाबाद जग प्रसिद्ध आहे. महत्त्वाच्या पर्यटन स्थळामध्ये वेरुळ येथील कैलास मंदिर, घृष्णेश्वर मंदिर याशिवाय इतर ३४ लेण्या आहेत. शिवाय बीवी का मकबरा ही आग्रा येथील ताजमहालाची प्रतिकृती आहे. तसेच यादवांनी बांधलेला दौलताबादचा देवगिरी किल्ला तसेच औरंगाबादपासून १०२ कि.मी. अंतरावर प्रसिद्ध अशी अजिंठा लेणीही जगप्रसिद्ध आहे.



**५) औद्योगिक क्षेत्र :**

औरंगाबाद जिल्ह्यातील वाळूज, शेंद्रा, चिकलठाणा त्याचप्रमाणे पैठण तालुक्यात औद्योगिक वसाहती आहेत. शेंद्रा येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहत त्याचप्रमाणे चिकलठाणा येथील आय.टी. पार्क ही देखील एक वसाहत आहे. तसेच या ठिकाणी छोटे कॉल सेन्टर्स व अनेक छोट्या आय.टी. कंपन्यादेखील आहेत.

**६) इतर :**

औरंगाबाद येथील पर्यटन क्षेत्र व ऐतिहासिक वारसा त्याचप्रमाणे औद्योगिक वसाहती, लेण्या या सर्व वैशिष्ट्यपूर्ण प्राकृतिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यांबरोबरच कृषी क्षेत्रातही जलसिंचनाच्या सुविधा वाढवून कृषी उत्पादन वाढत आहे. कृषी लागवडीखालील क्षेत्र त्याचप्रमाणे घरे, वसाहती, क्रीडांगणे, सार्वजनिक सेवा यांमध्ये शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, शासकीय कार्यालये, वाहतूक व्यवस्था इ. चा विचार भूमी उपायोजनामध्ये केलेला आढळतो.

औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी भूमी उपयोजन खालील सारणीच्या माध्यमातून दर्शविता येईल.

| अ. क्र. | तालुका | भौगोलिक क्षेत्र | जंगल व्याप्त क्षेत्र | कृषी लागवडी खाली नसलेले क्षेत्र | पडीक (गायरान) क्षेत्र | कायम स्वरूपी कुरण क्षेत्र | चराऊ, पडीक व जंगल युक्त क्षेत्र | सध्याचे पडझड क्षेत्र | इतर पडझड क्षेत्र | निव्वळ पेरणी केलेले क्षेत्र | एकूण पिका खालील क्षेत्र | पीक तीव्रता (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **औरंगाबाद** | ९४७७७ | २२४६३ | १०२६० | ६६६१ | १०२६० | २१९ | २४५८ | २७१८ | ४९९९८ | ८४१५७ | **१६८.३२** |
| २ | **फुलंब्री** | ६६२७९ | ४४२५ | ३७४८ | ४५३७ | ३७४८ | ८५ | ३१५४ | १६२६ | ४८७०४ | ५४५६१ | **११२.०३** |
| ३ | **पैठण** | १४२८१२ | १५५४ | २२९०० | ४२१५ | २२९०० | ७२८ | ४३७६ | ३५३८ | १०५५०१ | ११०७४७ | **१०४.९७** |
| ४ | **वैजापूर** | १५९४०३ | ३०५७ | ९६१८ | ८३२५ | ९६१८ | २२३७ | ४५४८ | २१४० | १२९४७८ | १३२६२३ | **१०२.४३** |
| ५ | **गंगापूर** | १३०८४६ | २२१९ | १५१३६ | ४४७४ | १५१३६ | १२८६ | ३२८१ | २५५४ | १०१८९६ | ११८३६५ | **११६.१६** |
| ६ | **खुलताबाद** | ५१८४६ | २०४७ | ३०९५ | ५९५२ | ३०९५ | २०५ | १३४२ | २१०८ | ३७०९७ | ५३३७१ | **१४३.८७** |
| ७ | **सिल्लोड** | १५१७२३ | २८२७ | २००११ | ६५३७ | २००११ | २१०० | ६१७८ | ३०४५ | १११०२५ | १२०९७१ | **१०८.९६** |
| ८ | **कन्नड** | १५५५४७ | ३०३१२ | ११४०२ | ६९२० | ११४०२ | २५४० | १९४७ | २००० | १००४२६ | ११३६५० | **११३.१७** |
| ९ | **सोयगाव** | ५४४९७ | १२५११ | ४७३ | १४८९ | ४७३ | ५०८ | ३०१७ | १३५६ | ३५१४३ | ६७९३८ | **१९३.३२** |
| | एकूण | **१००७७३०** | **८१४१५** | **९६६४३** | **४९११०** | **९६६४३** | **९९०८** | **३०३०१** | **२१०८५** | **७१९२६८** | **८५६३८३** | **१२९.२५** |

## निष्कर्ष :

१) औरंगाबाद जिल्हा प्राकृतिक रचनेच्या दृष्टिकोनातून वैशिष्ट्यपूर्ण आहे.

२) औरंगाबाद जिल्ह्यातील सर्वसाधारण व कृषी भूमी उपयोजनाचा शहरीकरणावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव दिसून येतो.

३) औरंगाबाद जिल्ह्यातील शेतकरी शेतीमध्ये जलसिंचन व विविध विकासाच्या योजनांचा लाभ घेत आहेत.

४) औरंगाबाद जिल्ह्याचा आर्थिक विकास कृषीबरोबरच पर्यटन व औद्योगिकीकरणामुळे सुद्धा होत आहे.

## समारोप :

औरंगाबाद जिल्ह्याची प्राकृतिक रचना, वैशिष्ट्यपूर्ण वसाहती तसेच पर्यटन स्थळे आणि ऐतिहासिक वारसा यामुळे एक वेगळीच ओळख निर्माण झाली असून या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे औरंगाबाद जिल्ह्याचे कृषी भूमी उपयोजन व सर्वसाधारण भूमी उपयोजन अभ्यासाच्या दृष्टिने महत्त्वाचे आहे.

## संदर्भ ग्रंथ -


१) Ali Mohammad, Dynamics of Agriculture Development in India, I[st] Edition, New Delhi.

२) Comprehensive District Agricultural Plan for Aurangabad District (2012-13 to 2016-17).

३) महेश्वर प्रसाद करण, आर्थिक भूगोल, किताबघर-८६/२५६, आचार्य नगर, कानपूर.

४) हुसैन माजिद, कृषी भूगोल, रावत पब्लिकेशन, जयपूर एवं नई दिल्ली.

५) घारपूरे विठ्ठल, कृषी भूगोल, पिंपळापूरे ॲण्ड कं., पब्लिशर्स, नागपूर.

६) सुरेश फुले, कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातूर.